जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

26 MAY 2023

सकाळ

# आठ विद्यार्थी 'उत्कृष्ट युवा संसदरत्न'

▸ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २५ : शिवाजी विद्यापीठात नुकत्याच झालेल्या सोळाव्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेअंतर्गत विद्यापीठातील आठ विद्यार्थ्यांची 'उत्कृष्ट युवा संसदरत्न' म्हणून निवड झाली. यामध्ये पवन पाटील, असिया जमादार, अनमोल पाटील, श्रेया म्हापसेकर, प्रतीक्षा पाटील, सिमरन घाशी, ऋतिका धनगर, प्रतीक्षा कांबळे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. विशेष बाब म्हणजे यामध्ये सात विद्यार्थिनींचा समावेश आहे.

संसदीय कार्य मंत्रालयामार्फत बक्षीस वितरण समारंभासाठी विद्यापीठातील समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांच्यासह निवड झालेल्या आठ विद्यार्थ्यांना नवी दिल्ली येथे निमंत्रित करण्यात येणार असल्याचे केंद्रीय संसदीय कार्यमंत्रालयाचे उपसचिव ए. बी. आचार्य यांनी जाहीर केले.

या राष्ट्रीय संसद स्पर्धेसाठीच्या संघ निवडीचा अंतिम निकाल कालांतराने जाहीर करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात आयोजित राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेमध्ये स्वच्छ भारत, कृषी, आरोग्य, महिला सक्षमीकरण,नवीन शैक्षणिक धोरण, आर्थिक धोरण, संरक्षण आदी विषयांवर अभ्यासपूर्ण चर्चा झाली. या स्पर्धेस निरीक्षक म्हणून उपसचिव आचार्य, शिक्षणतज्ज्ञ प्रा. एस. बी. देओसकर उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.




**कोल्हापूर : संसदीय कार्य मंत्रालयाचे उपसचिव ए. बी. आचार्य आणि निरीक्षक प्रा. एस. बी. देओसकर यांच्यासमवेत शिवाजी विद्यापीठात झालेल्या राष्ट्रीय युवा संसदेमध्ये उत्कृष्ट युवा संसदपटू बहुमानाचे मानकरी ठरलेले विद्यार्थी. शेजारी डॉ. प्रल्हाद माने, प्रकाश गायकवाड, तानाजी चौगुले आदी.**

### 'नेतृत्व कौशल्याचा विकास'

या स्पर्धेचा उद्देश केवळ विद्यार्थ्यांना राजकारणात येण्यासाठी प्रोत्साहित करणे इतकाच नसून युवकांमध्ये नेतृत्व कौशल्याचा विकास करण्याचा आहे, असे आचार्य यांनी सांगितले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते युवा संसद स्पर्धेमध्ये सहभागी सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

26 MAY 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातील आठ विद्यार्थी 'उत्कृष्ट युवा संसदरत्न'

## दिल्लीत होणार गौरव; पवन पाटीलसह सात विद्यार्थिनींचा समावेश

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात नुकत्याच पार पडलेल्या सोळाव्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेअंतर्गत विद्यापीठातील आठ विद्यार्थ्यांची 'उत्कृष्ट युवा संसदरत्न' म्हणून निवड करण्यात आली. यामध्ये पवन पाटील, असिया जमादार, अनमोल पाटील, श्रेया म्हापसेकर, प्रतीक्षा पाटील, सिमरन घाशी, ऋतिका धनगर, प्रतीक्षा कांबळे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. विशेष बाब म्हणजे यामध्ये सात विद्यार्थिनी आहेत.

संसदीय कार्य मंत्रालयामार्फत बक्षीस वितरण समारंभासाठी विद्यापीठातील समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांच्यासह निवड झालेल्या आठ विद्यार्थ्यांना नवी दिल्ली येथे निमंत्रित करण्यात येणार असल्याचे केंद्रीय संसदीय कार्य मंत्रालयाचे उपसचिव ए. बी. आचार्य यांनी यावेळी जाहीर केले. या राष्ट्रीय संसद स्पर्धेसाठीच्या संघ निवडीचा अंतिम निकाल कालांतराने जाहीर करण्यात येणार आहे.



**कोल्हापूर : विद्यापीठात पार पडलेल्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेअंतर्गत 'उत्कृष्ट युवा संसदरत्न' म्हणून निवड झालेले विद्यार्थी. यावेळी उपस्थित मान्यवर.**

विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात आयोजित राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेमध्ये स्वच्छ भारत, कृषी, आरोग्य, महिला सक्षमीकरण, नवीन शैक्षणिक धोरण, आर्थिक धोरण, संरक्षण इत्यादी विषयांवर अभ्यासपूर्ण चर्चा झाली. या स्पर्धेस निरीक्षक म्हणून केंद्रीय संसदीय कार्य मंत्रालयाचे उपसचिव ए. बी. आचार्य, शिक्षणतज्ज्ञ प्रा. एस. बी. देओसकर उपस्थित होते. स्पर्धा झाल्यानंतर आचार्य यांनी निकाल जाहीर केला.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते युवा संसद स्पर्धेमध्ये सहभागी सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी 'स्वच्छ भारत'ची शपथ घेतली.

2 6 MAY 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातील आठ विद्यार्थी 'उत्कृष्ट युवा संसदरत्न'

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात झालेल्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेअंतर्गत विद्यापीठातील आठ विद्यार्थ्यांची 'उत्कृष्ट युवा संसदरत्न' म्हणून निवड झाली. यामध्ये पवन पाटील, असिया जमादार, अनमोल पाटील, श्रेया म्हापसेकर, प्रतीक्षा पाटील, सिमरन घाशी, ऋतिका धनगर, प्रतीक्षा कांबळे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, यामध्ये सात विद्यार्थिनींचा समावेश आहे.

संसदीय कार्य मंत्रालयामार्फत बक्षीस वितरण समारंभासाठी विद्यापीठातील समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांच्यासह निवड झालेल्या आठ विद्यार्थ्यांना नवी दिल्ली येथे निमंत्रित करण्यात येणार असल्याचे केंद्रीय संसदीय कार्यमंत्रालयाचे उपसचिव ए. बी. आचार्य यांनी जाहीर केले.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात झालेल्या राष्ट्रीय युवा संसदेमधील 'उत्कृष्ट युवा संसदपटू' विद्यार्थ्यांसमवेत संसदीय कार्य मंत्रालयाचे उपसचिव ए. बी. आचार्य, निरीक्षक प्रा. एस. बी. देओसकर आदी.**

या स्पर्धेस निरीक्षक म्हणून केंद्रीय संसदीय कार्य मंत्रालयाचे उपसचिव ए. बी. आचार्य, शिक्षणतज्ज्ञ प्रा. एस. बी. देओसकर उपस्थित होते. स्पर्धा झाल्यानंतर आचार्य यांनी निकाल जाहीर केला. मान्यवरांच्या हस्ते युवा संसद स्पर्धेमध्ये सहभागी सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

स्पर्धा यशस्वीतेसाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. राष्ट्रीय संसद स्पर्धेसाठीच्या संघ निवडीचा अंतिम निकाल कालांतराने जाहीर करण्यात येणार आहे.

26 MAY 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात २४७ नवे अभ्यासक्रम

## सुधारित बृहत आराखडा मंजूर : आटपाडी, राधानगरी, गगनबावड्यात सॅटेलाईट सेंटर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जिल्हा स्तरावर लोककला महाविद्यालय, पदव्युत्तर डिप्लोमा इन इंडस्ट्रियल सेफ्टी, शारीरिक शिक्षण महाविद्यालय, इन्स्टिट्यूट ऑफ हॉर्टिकल्चर अँन्ड स्पायसेस, शुगर इन्स्टिट्यूट, तालुकास्तरावर क्रीडा, विधी, एकात्मिक शिक्षणशास्त्र, औषध निर्माणशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालय, कला, वाणिज्य, विज्ञान रात्र महाविद्यालये व कौशल्यावर आधारित २४७ नव्या अभ्यासक्रमांचा पाच वर्षांच्या बृहत आराखड्यात समावेश असून, गुरुवारी झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेत त्यास मंजुरी देण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली शाहू सभागृहात ही बैठक झाली.

विद्यापीठाचा २०२४-२५ ते २०२८-२९ या पाच वर्षांचा सुधारित बृहत आराखडा अधिसभेच्या विशेष बैठकीत एकमताने मंजूर करण्यात आला. याच बैठकीत १० मार्चला झालेल्या अधिसभेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्यात आला. सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील ५१ वा मराठी वार्षिक अहवालही मंजूर करण्यात आला. कुलगुरु डॉ. शिर्के म्हणाले, आटपाडी, राधानगरी आणि गगनबावडा या तालुक्याच्या ठिकाणांचा नव्याने सॅटेलाईट सेंटर सुरू होतील. ललित कला महाविद्यालयाचाही बिंदू या आराखड्यात आहे. आराखडा पुढील कार्यवाहीसाठी राज्य सरकारकडे पाठवण्यात येणार असल्याचे कुलगुरूंनी स्पष्ट केले.

यावेळी अधिसभेसमोर प्रकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी चर्चेतील मुद्दे मांडले. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस.पाटील यांनी बृहत आराखडा सभागृहासमोर सादर केला. त्यात त्यांनी संबंधित आराखडा तयार करण्यासाठी राबविलेली प्रक्रिया, नवीन अभ्यासक्रम, विद्याशाखा, महाविद्यालये, आदींची माहिती दिली. त्यानंतर झालेल्या चर्चेत अधिसभा सभागृहाने व्यवस्थापन परिषदेच्या सुधारित शिफारशीनुसार पंचवार्षिक बृहत आराखड्यास मान्यता देण्यात आली.

विद्यापीठाचा २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील ५१ वा मराठी वार्षिक अहवालही मंजूर करण्यात आला. हा अहवाल डॉ. रघुनाथ ढमकले यांनी सादर केला.

सिनेट सदस्य अभिषेक मिठारी यांनी २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील ५१ वा मराठी वार्षिक अहवालातील मुद्रितशोधनाच्या चुका निदर्शनास आणल्या.

आराखड्याबाबत अधिसभा सदस्य विष्णू खाडे, संजय परमणे, श्रीनिवास गायकवाड, श्वेता परूळेकर, डी. एन. पाटील, डॉ. मनोज पाटील, ज्ञानदेव काळे, अभिषेक मिठारी, अमित कुलकर्णी, अमरसिंह राजपूत, डॉ. रघुनाथ ढमकले आदींनी आक्षेप, सूचना आणि तक्रारी मांडल्या. बैठकीस चंदगडचे आमदार राजेश पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजयसिंग जाधव, उपकुलसचिव डॉ. विलास सोयम आदी उपस्थित होते. गेल्या सिनेट बैठकीत अभाविपचे कार्यकर्ते अचानक घुसल्यामुळे यावेळी जादा पोलिस बंदोबस्त होता.

### "सभात्याग" वरुन सदस्य आक्रमक

मागील अधिसभा सभेत अध्यक्षांनी स्थगन प्रस्ताव नाकारल्यानंतर काही सदस्यांनी काही काळासाठी या कृत्याचा निषेध करत सभात्याग केला होता. त्याचा उल्लेख व्हावा अशी सुधारणा ॲड. अभिषेक मिठारी आणि ॲड. अजित पाटील या सदस्यांनी दिली होती, पण प्रशासनाने "काही सदस्य सभागृहाबाहेर जाऊन आले" असा बदल करुन "सभात्याग" शब्द वगळला. त्यामुळे राज्यपालांपर्यंत खरी माहिती न देता ती दडपण्याचा हा प्रयत्न असल्याने प्रारंभी अधिसभेत काही सदस्य आक्रमक झाले. त्यावर कुलगुरूंनी कायदेशीर तरतुदी पाहून निर्णय घेण्याचे जाहीर केले.



## शिवाजी विद्यापीठ विशेष अधिसभा; अंतराच्या निकषावर जोरदार चर्चा

# चुका दुरुस्तीच्या ग्वाहीनंतर वार्षिक अहवालास मान्यता

▶ **सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २५ : बृहत आराखड्यात एकाच ठिकाणी दोन ते तीन नव्या महाविद्यालयांचे स्थळबिंदू देणे, नव्या-जुन्या महाविद्यालयांतील अंतराच्या निकषाचे पालन नसणे या मुद्द्यांवर आणि ५९ व्या वार्षिक अहवालातील मुद्रितशोधनच्या विविध चुकांवर शिवाजी विद्यापीठाच्या विशेष अधिसभेत (सिनेट) गुरुवारी जोरदार चर्चा झाली. त्यात चुकांच्या दुरुस्तीची कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी ग्वाही दिल्यानंतर अधिसभा सदस्यांनी वार्षिक अहवालास मान्यता दिली. त्यासह विद्यापीठाच्या २०२४ ते २०२९ या पंचवार्षिक बृहत आराखडा मान्य केला.

विद्यापीठातील राजर्षी शाहू सिनेट सभागृहात दुपारी १२ वाजता अधिसभा सुरू झाली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे उपस्थित होते. त्यात

> वार्षिक अहवाल, बृहत आराखड्याबाबत अधिसभा सदस्यांनी मांडलेली मते, सूचनांची नोंद घेतली आहे. आजच्या बैठकीतील सदस्यांनी केलेल्या सूचना संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या जातील. नव्या शैक्षणिक धोरणाची विद्यापीठाने अंमलबजावणी सुरू केली आहे. भविष्याच्यादृष्टीने अधिविभाग, महाविद्यालयांनी प्लेसमेंटचा विचार गांभीर्याने करावा. प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत उच्च शिक्षण पोहोचविण्याचे विद्यापीठाचे ध्येय आहे. ते लक्षात घेऊन निकषांचे पालन करून नव्या महाविद्यालयांचे स्थळबिंदू दिले जातील.
>
> **- डॉ. दिगंबर शिर्के**, कुलगुरू

प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी बृहत आराखड्यातील स्थळबिंदू आणि वैशिष्ट्यांची माहिती दिली. त्यावर अधिसभा सदस्य विष्णू खाडे, निखिल गायकवाड, श्वेता परूळेकर, डॉ. डी. एन. पाटील, मनोज पाटील, अभिषेक मिठारी, अमित कुलकर्णी, मनोज गुर्जर, आदींनी मते, सूचना मांडल्या. नव्या महाविद्यायांचे स्थळ बिंदू, अंतराचा निकष, अनुदानित महाविद्यालये आणि दूरशिक्षण केंद्रावर होणारा परिणाम आदी मुद्द्यांवर जोरदार चर्चा झाली. निव्वळ विरोध करायचा म्हणून आराखड्यावर प्रश्न उपस्थित करणे योग्य नसल्याचे अमरसिंह रजपूत, संजय परमणे यांनी सांगितले. त्यावर स्थळ बिंदू, अंतर आदी मुद्द्यांवर समिती, उपसमितींच्या माध्यमातून सविस्तर चर्चा केली असून आराखड्याला मान्यता देण्याचे आवाहन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले. त्यावर सदस्यांनी एकमताने आराखड्याला मान्यता दिली.

त्यानंतर वार्षिक अहवालाचा ठराव मांडला. त्यावर मिठारी यांनी मुद्रितशोधनाच्या चुका दाखवून दिल्या. अहवाल प्रसिद्धीला विलंब झाला. अहवालाच्या मराठी आवृत्तीत इंग्रजीचा वापर केला आहे. परिनियम ११७नुसारची कार्यवाही अहवालात नाही. स्त्रीअभ्यास केंद्र, अध्यासने, वनस्पतीशास्त्र, समाजशास्त्र अधिविभागाची माहिती नसणे, अहवालाच्या उपसमितीच्या अध्यक्षांच्या मनोगतामधील चुका त्यांनी दाखवून दिल्या. अहवालातील या सर्व चुका, त्रुटींची दुरुस्ती केली जाईल. त्याबाबत संबंधित समितीला सांगण्यात येईल. दुरुस्तीनंतरच योग्य स्वरूपातील अहवाल राज्य शासनाला पाठविण्यात येईल, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. शिर्के यांनी दिली. त्यानंतर सदस्यांनी वार्षिक अहवालला मान्यता दिली.

### अधिसभा सदस्य काय म्हणाले?

- **निखिल गायकवाड :** आराखड्यात चित्रपट निर्मिती अभ्यासक्रमाला स्थान नाही.
- **श्वेता परूळेकर :** नव्या विनाअनुदानित महाविद्यालयाला परवानगी देताना अनुदानित महाविद्यालयांना धक्का बसणार नाही याची दक्षता घ्यावी.
- **डॉ. डी. एन. पाटील :** नवीन महाविद्यालयांना स्थळबिंदू देताना अंतराच्या निकषाचा अभ्यास झालेला नाही.
- **प्रकाश कुंभार :** कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमांना चालना देताना बिंदू पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी घ्यावी.
- **अमित कुलकर्णी :** व्यावसायिक कॉलेजला अंतराचा निकष नसावा
- **रघुनाथ ढमकले :** नव्या महाविद्यालयांबाबत अंतराच्या निकषाचे पालन करावे.

**'प्रशासनाने शिस्त लावावी'**

वार्षिक अहवालासाठी केवळ १२ विभागांनी वेळेत माहिती दिली असल्याचे अभिषेक मिठारी यांनी सभागृहाला दाखवून दिले. अहवाल वेळेत शासनाला सादर होणे आवश्यक आहे. त्याबाबत प्रशासनाने अधिविभागांना शिस्त लावण्याची आग्रही मागणी अमित कुलकर्णी यांनी केली. त्यावर माहिती संकलनासाठी 'आयसीटी'चा वापर करण्याची सूचना प्रशासनाला केल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

**'सभात्यागा'च्या मुद्द्यावरून वातावरण तापले**

या बैठकीच्या प्रारंभी १० मार्चला झालेल्या अधिसभेचा वृत्तांत सादर करण्यात आला. त्यामध्ये मागील सिनेटवेळी सभात्यागाच्या मुद्द्यावरून अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी यांनी आक्षेप नोंदवला. वृत्तांत नोंदीत सभात्याग करून सभागृहात आले असा उल्लेख करण्याऐवजी सभागृहाबाहेर जाऊन आले अशी नोंद केली होती. त्यावर आक्षेप नोंदवल्यानंतर सभागृहात वाद झाला. त्याने काहीकाळ सिनेटमधील वातावरण तापले.

2 6 MAY 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**शिवाजी विद्यापीठ अधिसभा : आटपाडी, राधानगरी, गगनबावड्यात सॅटेलाईट सेंटर; २४७ नवीन अभ्यासक्रम**

# बृहत आराखडा एकमताने मंजूर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा २०२४-२५ ते २०२८-२९ पाच वर्षांचा सुधारित बृहत आराखडा अधिसभेच्या विशेष बैठकीत एकमताने मंजूर करण्यात आला. कला, विज्ञान व वाणिज्य शाखांमधील २४७ नवीन अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत. जिल्हा पातळीवर लोककला महाविद्यालय, पदव्युत्तर डिप्लोमा इन इंडस्ट्रियल सेफ्टी, शारीरिक शिक्षण महाविद्यालय, इन्स्टिट्यूट ऑफ हॉर्टिकल्चर अँड स्पायसेस, शुगर इन्स्टिट्यूट व तालुकास्तरावर क्रीडा, विधी, एकात्मिक शिक्षणशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालय, कला, वाणिज्य, विज्ञान रात्र महाविद्यालये व कौशल्यावर आधारित नवीन महाविद्यालयांचा समावेश असणार आहे.

अधिसभेची विशेष बैठक गुरुवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली झाली. प्रा. रघुनाथ ढमकले यांनी सादर केलेला



शिवाजी विद्यापीठातून...

५९ वा मराठी वार्षिक अहवाल मंजूर करण्यात आला. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी बृहत आराखडा सभागृहासमोर सादर केला. सदस्य श्रीनिवास गायकवाड यांनी सांगली, मिरजेत नवीन बिंदू अपेक्षित होते, यात सांगलीस संधी मिळाली नसल्याचे स्पष्ट केले. बृहत आराखड्यामुळे तालुक्यांमधील महाविद्यालयांना फटका बसू नये, अशी अपेक्षा श्वेता परुळेकर यांनी व्यक्त केली. 'सुटा'चे डी.एन.पाटील यांनी बृहत आराखड्यात अंतराचा अभ्यास झाला नाही. सुरळीत चाललेली महाविद्यालये बंद पाडणार असल्याचा आरोप केला. तर ज्ञानदेव काळे यांनी तीन जिल्ह्यांतील पारंपरिक महाविद्यालयांच्या नवीन बिंदूना विरोध दर्शविला. डॉ. प्रकाश कुंभार यांनी १२५ बिंदू नव्याने कॅरी फॉरवर्ड झाल्याचे सांगितले.

सदस्य अभिषेक मिठारी यांनी मराठी वार्षिक अहवालातील मुद्रितशोधनाच्या चुका निदर्शनास आणल्या. मराठी आवृत्तीचा अहवाल अर्धा मराठीत व अर्धा इंग्रजीत होता. केवळ १२ विभाग सोडले तर इतर सर्व विभागांनी ७ वेळा सूचना देऊनही ६ महिन्यांपर्यंत दिरंगाई केली. डॉ. ग. गो. जाधव अध्यासन केंद्र, बाळासाहेब देसाई अध्यासन केंद्र, मागासवर्गीय व अल्पसंख्याक योजनांच्या लाभार्थ्यांची माहिती अहवालात नसल्याचे ॲड. मिठारी यांनी निदर्शनास आणले. कुलगुरूंनी यासाठी सदस्यांचा समावेश असलेली समिती नेमण्यास मान्यता दिली. उपसमिती अध्यक्षांच्या मनोगतातील चुका, छापखाना विभागाने अहवाल देण्यास केलेला विलंबावर प्रश्न विचारला. त्यावर कुलगुरूंनी त्या दुरुस्त करून मराठी व इंग्रजीतील अहवाल शासनास पाठवण्यात येईल, मानव्यशास्त्र विभागाच्या अधिष्ठाता यांनी खातरजमा करावी, अशी सूचना कुलगुरूंनी केली.

बैठकीत सदस्य विष्णू खाडे, संजय परमणे, डॉ. मनोज पाटील, अमित कुलकर्णी, अमरसिंह राजपूत आदींनी आक्षेप, सूचना आणि तक्रारी मांडल्या.

यावेळी आ. राजेश पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, संलग्नता विभागाचे उपकुलसचिव डॉ. विलास सोयम आदी उपस्थित होते. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

## 'सभात्याग' शब्दावरून सदस्य आक्रमक

मागील अधिसभा सभेत अध्यक्षांनी स्थगन प्रस्ताव नाकारल्यानंतर काही सदस्यांनी काही काळासाठी या कृत्याचा निषेध करत सभात्याग केला होता. त्याचा उल्लेख व्हावा, अशी सुधारणा ॲड. अभिषेक मिठारी व ॲड. अजित पाटील यांनी दिली होती; परंतु प्रशासनाने 'काही सदस्य सभागृहाबाहेर जाऊन आले' असा बदल करून 'सभात्याग' हा शब्द वगळला. त्यामुळे राज्यपालांपर्यंत खरी माहिती न देता ती दडपण्याचा हा प्रयत्न असल्याने प्रारंभी अधिसभेत काही सदस्य आक्रमक झाले. त्यावर कुलगुरूंनी कायदेशीर तरतुदी पाहून निर्णय घेण्याचे जाहीर केले.

## स्कूल ऑफ फाईन आर्टस् सुरू करण्याचा मानस

आटपाडी, राधानगरी व गगनबावडा तालुक्याच्या ठिकाणी नव्याने सॅटेलाईट सेंटर सुरू होतील. सिनेमा, नाटक, इतर कला, संगीत यांचा समावेश असलेले स्कूल ऑफ फाईन आर्टस् येत्या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्याचा मानस आहे. ललित कला महाविद्यालयाचा बिंदू आराखड्यात आहे. आराखडा पुढील कार्यवाहीसाठी राज्य सरकारकडे पाठवण्यात येणार असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी स्पष्ट केले.

2 6 MAY 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# विद्यापीठाचा बृहत आराखडा एकमताने मंजूर

## अधिसभेत दोन तास चर्चा : ३१ मे पूर्वी राज्य शासनाकडे पाठवण्याचा निर्णय

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेत २०२४-२५ ते २०२८-२९ पंचवार्षिक बृहत आराखडा मांडण्यात आला. या आराखड्यातील त्रुटींसंदर्भात अधिसभा सदस्यांनी स्थगन प्रस्ताव मांडला परंतू अधिसभा अध्यक्ष कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी हा प्रस्ताव नाकारला. अधिसभा सदस्यांची आक्रमकता पाहून कायद्यानुसार बृहत आराखड्यावर चर्चा करण्यास अधिसभा अध्यक्षांनी परवानगी दिली. दोन तासांच्या चर्चेनंतर व्यवस्थापन परिषदेने मान्य केलेल्या विद्यापीठाचा पंचवार्षिक बृहत आराखडा एकमताने अंतिम मंजूरी देण्यात आली.

नवीन शैक्षणिक धोरणाला अनुसरून विद्यापीठाचा पंचवार्षिक बृहत आराखडा तयार करण्यात आला आहे. हा आराखडा कशा प्रकारे तयार केला आहे, यासंदर्भातील माहिती प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांनी दिली. विद्यापीठ अंतर्गत तिन्ही जिल्ह्यातील २८६



महाविद्यालयांचे बिंदू या बृहत आराखड्यात मांडण्यात आले आहेत.

काळानुसार कौशल्याधिष्ठित शिक्षण देण्यासाठी व्यवसायिक अभ्यासक्रमांना महत्व देण्यात आले आहे. नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी शिवाजी विद्यापीठाने सुरू केली आहे. त्यानुसार हा राज्यभरातील विद्यापीठांपैकी पहिला बृहत आराखडा आहे. क्रीडा विभागासाठी विद्यापीठात बिंदू असायला पाहिजे होता, पारंपरिक महाविद्यालयांबरोबर

- २०२४-२५ ते २०२८-२९ बृहत आराखड्यात कौशल्याधिष्ठित महाविद्यालयांचे बिंदू

व्यावसायिक अभ्यासक्रमाचा समावेश असावा. तसेच कौशल्यावर आधारीत महाविद्यालयांचे अनेक ठिकाणी तेच बिंदू पुन्हा-पुन्हा पडले आहेत.

सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यात अनेक ठिकाणी डॉ. नरेंद्र जाधव समितीच्या निकषानुसार १५ किलोमीटरच्या आत नवीन बिंदू टाकल्याचे सदस्यांनी सांगितले. तसेच अमरसिंह रजपूत आणि डॉ. रघुनाथ ढमकले यांनी सूचवलेली दुरुस्ती करीत कागल आणि सातारा जिल्ह्यातील जैतापूर येथील दोन बिंदू कमी करून एकच बिंदू व्यवस्थापन परिषदेने मंजूर केला आहे.

बृहत आराखड्यासंदर्भातीत चर्चेत डॉ. व्ही. एम. पाटील, अमित कुलकर्णी, डॉ. प्रकाश कुंभार, डॉ. संजय परमणे, विष्णू खाडे, डॉ. मनोज गुजर, डॉ. डी. एन. पाटील, डॉ. ज्ञानदेव काळे, श्वेता परुळेकर, श्रीनिवास गायकवाड, अभिषेक मिठारी आदींनी सहभाग घेतला. चर्चेनंतर सदस्यांच्या शंकांचे निरसन करताना कुलगुरु डॉ. शिर्के म्हणाले, उच्चशिक्षण देणाऱ्या संस्थांना वेगळा विचार करण्याची गरज आहे. नवीन महाविद्यालयांमध्ये अतिरिक्त स्टाप नेमून परीक्षा सुरळीत पार पाडली जाणार आहे. यावर परीक्षा विभाग व परीक्षेत सुधारणा करण्याच्या अनुशंगाने समिती काम करीत आहे. विद्यापीठातील ललित कला व स्कूल ऑफ फाईन आर्टस् महाविद्यालय सुरू केले जाईल. तसेच सभासदांनी मंजूर केलेला बृहत आराखडया ३१ मे पूर्वी राज्य शासनाला पाठवला जाणार आहे. यानंतर पंचवार्षिक बृहत आराखडा एकमताने मंजूर करण्यात आला. सचिवपदी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. त्यांनी अधिसभा सदस्यांचे आभार मानले.

लोकमत

# ३२ हजार जणांनी दिली परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल २०२३ उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम व द्वितीय वर्षातील सत्र एक ते चार मधील परीक्षांना गुरुवारी (दि.२५) प्रारंभ झाला. विविध महाविद्यालयांमध्ये या परीक्षा सुरू असून, गुरुवारी ३२ हजार २९९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. परीक्षेवेळी होणारे गैरप्रकार टाळण्यासाठी विद्यापीठाने भरारी पथके स्थापन केली आहेत. जिल्ह्यात १६ गैरप्रकार झाल्याचे आढळून आले.

महासत्ता

# सामाजिक प्रश्नांकडे डोळसपणे पहा-चौधरी

कोल्हापूर, ता.२४(प्रतिनिधी)-

.........................

दीर्घकाळ टिकणारा सिनेमा बनवायचा असेल तर समाजातील प्रश्नांकडे डोळसपणे पाहण्याची दृष्टी आणि संवेदनशील मन जोपासले पाहिजे, असे प्रतिपादन सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या ऑडिओ व्हिज्युअल प्रोग्राम विभागाचे प्रमुख मिथुनचंद्र चौधरी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ.ग.गो.जाधव पत्रकारिता अध्यासनामधील डॉक्युमेंट्री फोटोग्राफी आणि शॉर्ट फिल्म मेकिंग अभ्यासक्रमाचा शुभारंभ चौधरी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. फिल्म फेअर पुरस्कार प्राप्त दिग्दर्शक सचिन सूर्यवंशी अध्यक्षस्थानी होते तर अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ.शिवाजी जाधव यांनी केले.

यावेळी पत्रकारिता विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ.रत्नाकर पंडित, डॉ.अनमोल कोठाडिया, स्वप्निल पाटील, अभिजीत गुजर, आरजे पूजा यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन पुष्पा पाटील यांनी केले. आभार आकाश कुलकर्णी यांनी मानले.

2 6 MAY 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षांना सुरुवात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल २०२३ उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा २५ मे पासून व्यवस्थितपणे सुरू झाल्या आहेत. पहिल्या दिवशी ३२ हजार २९९ विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. पथकाकडून दि. २५ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातून १६ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत झाली असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

पुढारी

# विद्यापीठातर्फे निकाल घोषित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या ५६४ अभ्यासक्रमांपैकी ५५७ अभ्यासक्रमांचे निकाल आजअखेर घोषित झाले आहेत. दि. २५ मे रोजी बी.एड., बी.फार्मसी सत्र-१ या अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आल्याचे परीक्षा विभागाकडून सांगण्यात आले.

सकाळ

# पहिल्या दिवशी कॉपी करणाऱ्या १६ विद्यार्थ्यांना पथकाने पकडले

## उन्हाळी सत्रातील परीक्षा सुरू; ३२२९९ परीक्षार्थी

कोल्हापूर, ता. २५ : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल या उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षा गुरुवारपासून सुरू झाल्या. पहिल्या दिवशी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील एकूण ३२,२९९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. या दरम्यान गैरप्रकार (कॉपी) करणाऱ्या कोल्हापूर जिल्ह्यातील १६ विद्यार्थ्यांना भरारी पथकाने पकडले. वर्णनात्मक ऑफलाईन असे या परीक्षांचे स्वरूप आहे. परीक्षा व मूल्यमापन मंडळाने बी.एड. सत्र एक आणि दोन, बी. फार्मा सत्र एक आणि दोन या अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले आहेत.

बी. कॉम., बी. ए., बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, आर्टस् अँड बॅचलर ऑफ एज्युकेशन, बॅचलर ऑफ आर्टस् (ड्रेस मेकिंग अँड फॅशन को-ऑर्डिनेशन), कॉमर्स बँक मॅनेजमेंट, सोशल वर्क, कॉमर्स (आयटी), बॅचलर ऑफ आर्टस् डिफेन्स स्टडी, डिझाईन या अभ्यासक्रमांची परीक्षा झाली. त्यासाठी एकूण ३२,२९९ परीक्षार्थींनी हजेरी लावली. दरम्यान, या परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाने भरारी पथकांची स्थापना केली आहे. कोल्हापूर जिल्ह्यात भरारी पथकाने केलेल्या कारवाईमध्ये गुरुवारी १६ विद्यार्थी कॉपी करताना सापडले. त्याची नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली आहे, अशी माहिती परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली. विद्यापीठाने हिवाळी सत्रात परीक्षांमधील एकूण ५५७ अभ्यासक्रमांचे निकाल आतापर्यंत जाहीर झाले आहेत.

### संकेतस्थळ पूर्ववत

- विद्यापीठाच्या संकेतस्थळावर बुधवारी सायंकाळी पाचच्या सुमारास व्हायरसचा ॲटक झाला होता. त्यामुळे संकेतस्थळ बंद ठेवले होते. रात्री उशिरापर्यंत तांत्रिक प्रक्रिया सुरू होती. गुरूवारी सकाळी साडेनऊ वाजता प्रशासनाकडून संकेतस्थळ पूर्ववत करण्यात आले.